# "पॅट"ची अनुभवसिध्द प्रभावी आयुर्वेदिक औषधे

**ॲमीपॅट टॅब्लेट्स :-** आव,आमांश,संग्रहणी,प्रवाहिका,चिकट संडास, पोटफुगी, पोटदुखी इ.वर

**अल्सीपॅट टॅब्लेट्स :-** आम्लपित्त(ॲसिडिटी),गॅसेस,छातीखाली जठराशी जळजळणे, सतत बारीक डोके दुखणे इ.वर

**नर्व्हीपॅट सिरप :-** बुध्दिमत्ता,स्मरणशक्ती,निर्णयक्षमता व मानसिक सहनशीलता यांचा दर्जा उंचाविण्याकरिता एक उत्तम बुध्दिवर्धक.

**डबलमिल्स लिक्विड :-** अल्कोहोलविरहीत,गुंगी न आणणारे,आगळ्या-वेगळ्या चवीचे दिपक-पाचक टॉनिक.

**फेमिपॅट सिरप :-** महिलांकरिता परिपूर्ण टॉनिक, मासिक पाळीतील सामान्य तक्रारींवर विशेष उपयुक्त.

**ल्युकोपॅट टॅब्लेट्स :-** महिलांमधील मासिक पाळीतील सामान्य तक्रारींमुळे होणाऱ्या ॲनिमिया (प्रमेह) मध्ये विशेष गुणकारी.

**कॅम्पाईल टॅब्लेट्स :-** मूळव्याध (बवासीर, पाईल्स), तोंड येणे (मुँहमे छाले), डोळ्यांची आग व लालपणा, हातापायांची आग, व सर्व प्रकारच्या उष्णतेच्या तक्रारींवर अत्यंत प्रभावी औषध.

**लिव्हस्प्लिन सिरप :-** एक उत्तम परिपूर्ण दिपक-पाचक-सारक टॉनिक,कावीळ, तसेच लिव्हर व स्प्लिनला येणारी सूज यामध्ये विशेष लाभदायक, लहान मुले,महिला व वयोवृध्द रुग्णांना विशेष पसंत.

**लिव्हस्प्लिन टॅब्लेट्स :-** आयुर्वेदांतील विशेषमान्य आरोग्यवर्धिनी व जगन्मान्य कोरफड युक्त पाठामुळे सर्व प्रकारच्या काविळींवर, यकृत व प्लीहा यांना येणारी सूज यांमध्ये उपयुक्त, नियमित व सतत /अपरंपार मद्यपान करणाऱ्यांना वरदान (विशेष उपयुक्त)

**पॅट कफ सिरप :-** प्रदूषणामुळे व हवामानांतील बदलामुळे होणाऱ्या सामान्य सर्दी-खोकल्यावर लाखों रूग्णांनी प्रशंसिलेले आयुर्वेदिक, अल्कोहोलविरहीत, गुंगी न आणणारे उत्कृष्ठ चवीचे अनुभवसिध्द कफ सिरप.

(फक्त आयुर्वेदिक / मेडिकल स्टोअर्स / वैद्यकीय व्यावसायिकांसाठी प्रकाशित)

इ. स. १९७९ पासून आयुर्वेदाच्या सेवेत!


PAT पॅट फार्मास्युटिकल्स्

यशोमंगल,जुन्या पोस्टाजवळ, डॉ.पटवर्धन रोड,
पनवेल (जि.रायगड)४१०२०६.
फोन :- 022 - 27456039
E-mail:- pat_pharma@yahoo.com



PAT

# डबलमिल्स

लिक्विड



महाभारतांतील भीमाएवढी भूक व शक्ती मिळवा. आयुर्वेदिक डबलमिल्स लिक्विड घ्या.



आगळ्या वेगळ्या चवीचे आयुर्वेदिक पाचक टॉनिक डबलमिल्स लिक्विड



निरंतर निरामय आरोग्याचा महामंत्र :-
संतुलन व संवर्धन करा
रोगप्रतिकारशक्ती, सौंदर्य, बुध्दी, मनसंतुलन व शक्ती !
"पॅट"ची औषधे देतील निरंतर निरामय आरोग्याची प्राप्ती !!

||श्रीगणेशाय नमः||  ||श्रीधन्वन्तरये नमः||  ||श्रीकरंजेश्वरी नमः||  ||श्रीव्याडेश्वराय नमः||

## प्रास्ताविकः-

महाभारतातील कथानकाप्रमाणे, भीम हा बकासूर राक्षसाचे गाडाभर अन्न खाऊन त्याचा शिरच्छेद करतो.म्हणूनच पुराणकाळापासून भीम हा अतिप्रचंड आहार व बलदंड शक्ती याबद्दल अंतिम परिमाण म्हणून मानला गेला आहे.आजही आबालवृध्द भीमाला परमोच्च शक्तीचे प्रतीक मानतात. अनेक घरांमध्ये आजही लहान मूल जेवत नसेल तर त्याची आई-आजी त्याला भीम-बकासूराची गोष्ट सांगत घास भरवताना दिसतात आणि म्हणूनच आम्हाला वरील कथानक हे आमच्या डबलमिल्स लिक्विड या आयुर्वेदिक पाचक टॉनिक करिता प्रतिक-कथा व प्रतिक-व्यक्ति म्हणून निवडावे असे वाटले.

## आयुर्वेदिक पाचक टॉनिक म्हणजे काय ?

टॉनिक याचा अर्थ जे औषध अपेक्षित इंद्रिय किंवा संस्था यांना अधिक गतीने प्रभावीपणे कार्यरत करते, ते टॉनिक.
पाचक टॉनिक हे पचन-संस्था अधिक गतीने व अधिक प्रभावीपणे कार्यरत करते.
आयुर्वेदिय दृष्टया पाचक टॉनिक या शब्दाची अर्थमीमांसा पुढीलप्रमाणेः-

आयुर्वेदियदृष्टया, षड्रस आहार आपण रोज घेतला व आपली पचनसंस्था व्यवस्थित काम करीत असेल तर त्याचे सप्तधातूत रूपांतर होते.म्हणूनच ज्या औषधाने उत्तम भूक लागते, खालेले पचते व पचलेले अंगी लागते, ते पाचक टॉनिक.

आता, या पाचक टॉनिकचा भूकेशी अत्यंत जवळचा संबंध आहे. व आयुर्वेदिय दृष्टया, भूक वाढविणारे औषध हे मधुर-रस असलेले (फक्त गोडचगोड) नसावे.

आम्ही बाजारांत असलेल्या सर्व पाचक टॉनिकांचा अभ्यास केला असता ती फक्त मधुर-रस व गोड चव असलेली आढळली. डबलमिल्स लिक्विड हे भारतांतील पहिले आगळया-वेगळया आंबट-तिखट-खारट व थोडे मधुर चव असलेले आयुर्वेदिय पाचक टॉनिक आहे व ते वर सांगितल्या आयुर्वेदिय कसोटयांना उतरते.

## आयुर्वेदिय पाचक टॉनिक ची खरोखरच बाजारांत आवश्यकता आहे कां ?

त्याचे उत्तर होय असे आहे. भारतामध्ये पाचक टॉनिकची बाराही महिने आवश्यकता आहे याची चार प्रमुख कारणे आहेत.
१) विस्तीर्ण किनारपट्टी  २) फास्ट लाईफ  ३) फास्ट फूड  ४) ॲलोपॉथिक औषधांचे दुष्परिणाम

**१) विस्तीर्ण किनारपट्टी :-** भारताला तिन्ही बाजूंनी समुद्रकिनारा लाभला असून बहुसंख्य शहरे-गांवे व वस्त्या या किनारपट्टीवर वसलेल्या आहेत. या शहर-गांव-वस्त्यांमध्ये खारी-समशीतोष्ण हवा व हल्ली पाणी शुध्दिकरणासाठी वापरण्यांत येणारी क्लोरिन किंवा तत्सम औषधे या दोन्ही कारणांमुळे या भागांमध्ये कायम पचनाचा त्रास प्रामुख्याने आढळतो.

**२) फास्ट लाईफः-** हा २१ व्या शतकाचा शाप आहे.प्रत्येक माणूस जीवनांत यशस्वी होण्याकरिता वेगाने पळण्याचा प्रयत्न करीत असतो.त्यामुळे सकाळी गाडी पकडण्याकरीता घाईघाईने जेवणे, दुपारी लंच-टाईम थोडा म्हणून उभ्या-उभ्या किंवा बकाबका खाणे,अपरंपार चहा-कॉफी-तंबाखू-सिगारेट व रात्रौ अतिश्रम व दुसऱ्या दिवशीची भ्रांत यामुळे निरस मनाने जेवणे या सगळयाचा परिणाम म्हणजे पचनशक्ती लोप होणे.सणसणीत भूक लागली असे म्हणणारा एखादाच. अगदी कार्यामध्ये सुध्दा लग्न-मुंज लागायच्या आधीच जेवणे सुरू, कां तर म्हणे गाडया पकडायच्या असतात.आणि हो, जेवणाच्या पंक्ती व वदनकवळ चा घोष जाऊन बुफे-सिस्टिम आली म्हणजे इथे पुन्हा पचनाचा बट्टयाबोळ. असो, कालाय तस्मै नमः। दुसरे काय ?

**३) फास्ट फूड :-** या फास्ट फूड मध्ये सुध्दा चायनीज पदार्थांमध्ये वापरले जाणारे अजिनोमोटो व साऊथ पदार्थांमध्ये वापरला जाणारा सोडा आणि पंजाबी पदार्थांचा चमचमीतपणा / तिखटपणा या सर्वांनी तात्पुरते पोट भरल्यासारखे वाटते. परंतु याचा निरंतर परिणाम म्हणजे पचनशक्ती लोप पावते. म्हणून अशा परिस्थितीत डबलमिल्स लिविवड तुमच्या पचनशक्ती रूपी बोटीला दीपस्तंभासारखी दिशा देते.

**४) ॲलोपॅथिक औषधांचे दुष्परिणामः-** आजकाल जवळजवळ प्रत्येकाला ॲण्टिबायोटिक्स, सल्फा व यासारखी इतर अनेक औषधे घ्यावी लागतात व या सर्व औषधांचे पचनशक्तीवर दुष्परिणाम दिसून येतात.या सर्वांबरोबर डबलमिल्स लिक्विडचा एक कोर्स करणे नक्कीच फायदेशीर.

## डबलमिल्स लिक्विड कोणी घ्यावे ?

१) व्यवसायानिमित्त वा कारणाने प्रवास करावा लागणाऱ्यानी
२) नोकरी निमित्ताने जेवण बाहेर घेणाऱ्यानी.
३) वाढत्या वयाच्या विद्यार्थ्यांनी.
४) गर्भवती महिलांनी तर अवश्य घ्यावे. त्याची कारणे खालीलप्रमाणेः- (विशेषतः पहिल्या ३ ते ६ महिन्यांपर्यंत)
   अ) डबलमिल्स लिक्विड ची आगळी-वेगळी चव डोहाळे लागणाऱ्या महिलांना अतिशय आवडते.
   ब) एकाच पचन संस्थेवर दोन जीव वाढत असतात, त्यामुळे या काळांत मातृ-पचन संस्थेवर मोठा बोजा असतो.
      डबलमिल्स लिक्विड भूक वाढविते, व अन्न पचविते.
   क) गर्भारपणांत पायांना थोडी सूज असते,डबलमिल्स लिक्विड मध्ये असलेले धने व गोखरू ही सूज कमी करण्यास मदत करते.
५) जेष्ठ नागरिक उर्फ वयस्क व्यक्ति :- उतार वयांत पचनशक्ति थोडी कमजोर झालेली असते. अशावेळी दोन महिन्यांतून एकदा डबलमिल्स लिक्विड चा एक कोर्स केल्यास पचनाची गाडी अगदी रूळावर येते.
६) बैठे काम करणारे शेठजी वा ऑफिसमध्ये तत्सम जॉब करणाऱ्यानी.
७) सर्व ॲलोपॅथिक औषधांबरोबर वा नंतर डबलमिल्स लिक्विड चा एक कोर्स केल्यास पचनशक्ती बिघडण्याचा धोका उद्भवत नाही.

## डबलमिल्स लिक्विड कसे काम करते ?

प्रमुख घटक :-

**आलेरस,लिंबूरस,चवक, मिरी, पिंपळी, धने, गोखरू, पंचलवण.**

हे प्रमुख घटक असून भूक वाढवितात,पचनशक्ति वाढवितात, गॅसेस कमी करतात.
डबलमिल्स लिक्विडच्या चवीमुळे जेवणाबद्दल आलेली अरूचि कमी होते,
आलेरस, मिरी, पिंपळी, चवक ही औषधे त्रिदोषनाशक असल्याने डबलमिल्स लिक्विडला रसायन गुणधर्म देतात व म्हणूनच डबलमिल्स लिक्विड हे शक्तिदायक टॉनिक आहे.
धने व गोखरू यांचा अंर्तभाव ही डबलमिल्स लिक्विडची खासियत आहे.
त्यामुळे बुध्दिजीवी व बसून काम करणाऱ्या लोकांमध्ये जेवणाबद्दलची अरूचि, मंद भूक, मंद पचनशक्ति व जेवणानंतर येणारा जडपणा कमी करते.
गर्भावस्थेमध्ये होणारा उपयोग वर सांगितलेला आहे.
डबलमिल्स लिक्विड मधील पंचलवण हे हाय पोटॅशियम व लो सोडियमचे नैसर्गिक स्त्रोत असल्यामुळे हार्टचा किंवा रक्तदाबाचा त्रास असणाऱ्यांना डबलमिल्स लिक्विड पाचक टॉनिक म्हणून उत्तम काम करते. थोडक्यांत, पंचलवण डबलमिल्स लिक्विडची चव वाढविते, व पाचक टॉनिक म्हणून परिपूर्ण करते.

## डबलमिल्स लिक्विड कसे घ्यावे ?

१) सामान्य पचनाची तक्रार व पाचक टॉनिक म्हणून घेणाऱ्यांनी डबलमिल्स लिक्विड २ -३ चमचे दिवसांतून २ वेळा जेवणापूर्वी अर्धा तास पाण्याबरोबर १० दिवस घेणे.
२) भूक, गॅस व पचनशक्तिचा तीव्र तक्रार असणाऱ्यांनी डबलमिल्स लिक्विड ४-४ चमचे औषध जेवणापूर्वी अर्धा ते एक तास आधी दिवसांतून २ ते ३ वेळा (१० दिवस) घेणे व नंतर १० दिवस सामान्य पाचक टॉनिक प्रमाणे घ्यावे.
३) पचनशक्ति सुधारण्याकरिता योगासने, इतर व्यायाम व पंचकर्माचा अतिशय चांगला फायदा होतो.तज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.



